शिक्षण / आरोग्य / रोजगार / कला /क्रीडा / महिला सक्षमीकरण

# रयत विद्यार्थी विचार मंच

संस्थापक / अध्यक्ष : धम्मराज साळवे

➢ **कार्यअहवाल : सन २०२०**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाल्यानंतर देखील आजही एक मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित आहे.अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्ध्यावर सोडतात. मराठवाड्यातील एका विद्यार्थीनीने बस पास साठी २५० रूपये नाहीत म्हणून आत्महत्या केली. अनेक विद्यार्थी आपल्या शिक्षणाचे ओझे पालकांवर नको म्हणून शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी अर्ध्यावर शिक्षण सोडतात किंवा आत्महत्या करतात.एवढ्या शुल्लक कारणांसाठी विद्यार्थ्यांनी अर्ध्यावर शिक्षण सोडणे किंवा आत्महत्या करणे हे अतिशय दुर्देवी आहे.आपल्या अवती भोवती अनेक गरजु, होतकरू विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहतात त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणुन शैक्षणिक प्रगल्भ करणे हा देशाच्या विकासाचा पाया आहे. आपण सर्व विद्यार्थी मिळुन आपल्यातील गरजु व होतकरू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन त्यांना सक्षम करूया. याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच कार्य करत आहे. आपणही या संकल्पनेत सहभाग घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदतीचा हात पुढे करूया..

- **धम्मराज नवनाथ साळवे**

**संस्थापक / अध्यक्ष**




चला बनू भविष्य जगाचे...
art_bhagyashree






**दिनांक ०१ जानेवारी २०१९**

**दैनिक प्रभात वर्धापन दिन**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने दैनिक प्रभातच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.



## दिनांक २ जानेवारी २०२०

## शिक्षणाच्या_नावावरील भ्रष्टाचारास रयतचा_विरोध

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सत्ताधारी ,प्रशासन आणि ठेकेदार यांच्या आर्थिक हितसंबंधांसाठी व ठेकेदाराला पोसणे व टक्केवारी मिळवणे याकरिता ,शिक्षण मंडळाने शैक्षणिक वर्ष संपत आलेले असताना ८२ लाखाच्या वह्यां खरेदीचा घाट घातला आहे .ठराविक एका ठेकेदाराची यामध्ये मक्तेदारी असल्याने मनमानी पद्धतीने या ठेकेदाराला शालेय साहित्य पुरविण्याचा ठेका देण्याचा निर्णय घेऊन नागरिकांच्या पैशांची उधळपट्टी महानगरपालिका स्थायी समिती शिक्षण मंडळ करत आहे . शैक्षणिक वर्ष संपत असून फक्त एक महिन्याच्या करीता ८२ लाख रुपयांच्या वह्या घेणं गरजेचं वाटत नाही.विद्यार्थ्यांना विचारले असता सध्या वह्यांची गरज नाही असे जाणवत आहे .तरी हा सदर निर्णय तात्काळ रद्द करावा अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे करण्यात आली.

पुढारी

# वह्या खरेदीचा निर्णय रद्द करण्याची मागणी

**पिंपरी : प्रतिनिधी**

शिक्षण मंडळाने वह्या खरेदीचा निर्णय घेतला आहे. यामध्ये आर्थिक गैरव्यवहार होण्याची शक्यता आहे. वह्या खरेदीचा निर्णय अयोग्य असून तो तत्काळ रद्द करावा, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने करण्यात आली. या बाबत पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

या वेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, अतुल वाघमारे या वेळी उपस्थित होते.

निवेदनात नमूद केले आहे की, महापालिकेतील सत्ताधारी, प्रशासन आणि ठेकेदार यांच्या आर्थिक हितसंबंधांसाठी वह्या खरेदीचा घाट घातला आहे. ठेकेदाराला पोसणे व टक्केवारी मिळवणे याकरिता शिक्षण मंडळाने शैक्षणिक वर्ष संपत आले असताना ८२ लाखांच्या वह्या खरेदीचा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला दिले जाते. ठराविक ठेकेदाराची यामध्ये मक्तेदारी असल्याने, मनमानी पद्धतीने या ठेकेदाराला शालेय साहित्य पुरविण्याचा ठेका देण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांच्या पैशांची उधळपट्टी यातून होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात ला आहे.

शैक्षणिक वर्ष संपत आले आहे. या पार्श्वभूमीवर ८२ लाख रुपयांच्या वह्या घेणे गरजेचे वाटत नाही. फेब्रुवारी व मार्च महिन्यांमध्ये विद्यार्थ्यांच्या परीक्षा असतात. सर्व अभ्यासक्रम एक महिन्यात शिकवून पूर्ण होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही सद्य:स्थितीत वह्या उपयुक्त ठरणार नाहीत. टक्केवारी मिळवणे व ठेकेदाराच्या आर्थिक लागेबांधे जपणे यासाठीच ही निर्णय घेण्यात आल्याचे दिसते. त्यामुळे महानगरपालिकेने वह्या खरेदीचा निर्णय त्वरीत रद्द करावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

My Pimpri Edition
3 Jan, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

दिनांक ०३ जानेवारी २०२०



# ठेकेदाराच्या आर्थिक हितासाठीच वह्यांची खरेदी

**पिंपरी, दि. ५ (प्रतिनिधी)** - शिक्षण मंडळाने कोणतीही निविदा प्रक्रिया न राबविता थेट पद्धतीने ८२ लाख रुपयांच्या वह्या खरेदीचा घेतलेला निर्णय सत्ताधारी मंडळी, प्रशासन आणि ठेकेदारांच्या अर्थिक हित जोपासण्यासाठी घेतला असून हा वह्या खरेदीचा निर्णय रद्द करावा, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शिक्षण मंडळाने थेट पद्धतीने विद्यार्थ्यांसाठी वह्यांची खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या निर्णयाचा विद्यार्थ्यांना कोणताही फायदा होणार नसून उलट यामध्ये आर्थिक गैरव्यवहार होण्याचीच अधिक शक्यता आहे. विद्यार्थ्यांच्या वह्या खरेदीमधून सत्ताधारी तसेच ठेकेदाराचे आर्थिक हितसंबधासाठी हा घाट घातला आहे. ठेकेदाराला पोसणे व टक्केवारी मिळवणे या करीता

■ निर्णय रद्द करा : रयत विद्यार्थी विचार मंचची मागणी

शिक्षण मंडळाने शैक्षणिक वर्ष संपत आले असताना ८२ लाख रुपयांच्या वह्या खरेदीचा निर्णय घेतला आहे. महापालिका शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला दिले जाते. सध्या शैक्षणिक वर्ष संपत असून विद्यार्थ्यांच्या फेब्रुवारी व मार्च महिन्यात परीक्षा आहेत. सर्व अभ्यासक्रम महिनाभरात पूर्ण होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना सद्यस्थितीत वह्या उपयुक्त ठरणार नाहीत. त्यामुळे, हा निर्णय तत्काळ रद्द करावा, असेही या मागणी या निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर रयत विद्यार्थी विचार मंचचे अध्यक्ष धम्मराज सावळे, महासचिव संतोष शिंदे, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, अतुल वाघमारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

प्रभात Mon, 06 January 2020 epaper.eprabhat.net/c/47681367

दिनांक ०६ जानेवारी २०२०




**दिनांक ०२ फेब्रुवारी २०२०**
**शैक्षणिक कार्याचा सन्मान**

मैत्री ग्रुप,दापोडी रविभाऊ कांबळे मित्र परिवाराच्या वतीने शैक्षणिक कार्याची दखल घेत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.





**दिनांक १९ फेब्रुवारी २०२०**
**छत्रपती शिवाजी महाराज जयंती**

स्वराज्याचे संस्थापक,जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर,महासचिव संतोष शिंदे, सचिव नीरज भालेराव,समाधान गायकवाड,प्रीतम वाघमारे व अन्य सदस्य पदाधिकारी उपस्थित होते.






## दिनांक १२ मार्च  २०२०

## कोरोना व्हायरस संदर्भात जनजागृती

पिंपरी चिंचवड शहरातील सर्व  शाळांमध्ये कोरोना व्हायरस संदर्भात जनजागृती करणे व आवश्यक साधने (मास्क, सॅनिटायझर) उपलब्ध करून देणे संदर्भात सदर विषयाचे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने मा.महापौर / स्थायी समिती सभापती  यांना देण्यात आले यावेळी संस्थापक /अध्यक्ष - धम्मराज साळवे ,महासचिव संतोष शिंदे ,कार्याध्यक्ष अंजना गायकवाड , सचिव नीरज भालेराव ,शहर संघटक अमोल गायकवाड ,मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे उपस्थित होते





**दिनांक १० एप्रिल २०२०**

**कोरोनाबाबत नागरिकांना मीडियाच्या माध्यमातून आवाहन करताना**

कोरोनाने पूर्ण जगात थैमान घातले असून देशव्यापी लॉकडाउन जाहीर करण्यात आला असून सर्व नागरिकांनी सरकारला व प्रशासनाला सहकार्य करावे, सर्व नियमांचे पालन करावे या संदर्भात आज तक मीडियाच्या माध्यमातून नागरिकांना आवाहन करताना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर





## दिनांक १० मे २०२०

## पोलीस अधिकारी मा.सुशांत अवचारे यांची सदिच्छा भेट

कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी मा.सुशांत अवचारे साहेब हे दोन आठवड्यापासुन पिंपरी चिंचवड या ठिकाणी रुजू झाले आहेत. यांनी आज पिंपरी संपर्क कार्यालयास भेट दिली.यावेळेस त्यांच्यासोबत अनेक विषयांवर चर्चा झाली.त्यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या कार्याबद्दल माहिती दिली.रयत विद्यार्थी विचार मंचाचे मार्गदर्शक म्हणून ते संस्थेसोबत राहतील असे त्यांनी आश्वासन दिले.गडचिरोली मध्ये नक्षलवादी लोकांचा अतिरेक वाढला आहे म्हणून ते आता त्या ठिकाणी ड्युटीवर चालले आहेत.त्यांना या मोहिमेसाठी व त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


विद्यार्थ्यांना टॅब, इंटरनेट उपलब्ध करून द्या, अन्यथा ऑनलाईन शिक्षण तात्काळ बंद करा; रयत विचार मंचची मुख्यमंत्र्यांकडे मागणी -

PCLIVE7.COM


विद्यार्थ्यांना टॅब, इंटरनेट उपलब्ध करून द्या, अन्यथा ऑनलाईन शिक्षण तात्काळ बंद करा; रयत विचार

दिनांक २२ जुन २०२०



दिनांक २२ जुन २०२०

लॉकडाउनच्या काळात ऑनलाइन शिक्षणपद्धती चालू झाली असून विद्यार्थी घरीच अभ्यास करत आहेत.लॉकडाउन मूळे अनेक गरीब कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खालावली आहे.यामुळे रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी येथील गरजू विद्यार्थ्यांकरिता पालकाकडे संस्थेच्या वतीने शैक्षणिक साहित्य देण्यात आले.



प्रति

माननीय संस्थापक / अध्यक्ष

रयत विद्यार्थी विचार मंच

अर्जदार :- संचाली रेखा सावंत.

विषय :- शैक्षणिक साहित्य मिळण्या बाबद.

महोदय,
वरील विषय विनंती पूर्वक मी संचाली रेखा सावंत. इयत्ता १० वी न्यू इंग्लिश स्कूल विजलीनगर या शाळेत शिक्षण घेत असून. सध्या लॉकडाउनच्या परस्थिती आमची कुटूंबाची आर्थिक परस्थिती हलाखीची असून अमच्या घरात कमवती व्यक्ती फक्त माझी आई असून इतर आर्थिक साधने नाहीत. मी व माझी लहान बहीन नयन आम्ही शिक्षण घेत आहोत सध्या लॉकडाउन मुळ आईच्या पगार बंद आहे आणि शाळा चालू झाल्या आहेत तरी शाळेकरीता / शैक्षणिक वर्षा करीता २ डझन वह्या व पेन मिळावेत ही आपणास नम्र विनंती.

संचाली रेखा सावंत.

Mob. No : 9890668011



दिनांक २५ जुन २०२०

लॉकडाउनच्या काळात ऑनलाइन शिक्षणपद्धती चालू झाली असून विद्यार्थी घरीच अभ्यास करत आहेत.लॉकडाउन मूळे अनेक गरीब कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खालावली आहे.यामुळे रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने आकुर्डी बीजलीनगर येथील गरजू विद्यार्थिनींला संस्थेच्या वतीने शैक्षणिक साहित्य देण्यात आले.





**दिनांक २६ जुन २०२०**

**राजर्षी शाहू महाराज जयंती**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने लोककल्याणकारी राजे राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त संपर्क कार्यालय येथे अभिवादन करण्यात आले.. यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर महासचिव संतोष शिंदे, राज्यसंघटक रोहित कांबळे उपस्थित होते..

**४ पुढारी MY पिंपरी-चिंचवड** बु

**संक्षिप्त**



रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांना अभिवादन करण्यात आले.

## राजर्षी शाहू महाराज यांना अभिवादन

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक धम्मराज साळवे यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी महासचिव संतोष शिंदे, संघटक रोहित कांबळे आदी उपस्थित होते. यावेळी धम्मराज साळवे यांनी शाहू महाराजांनी ज्याप्रकारे समाजातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सर्व सोयी उपल्बध करून दिल्या. शाहू महाराजांच्या या विचारांवर चालून रयत विद्यार्थी विचार मंच संस्था त्याचप्रमाणे गरीब, गरजू ,होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सर्वोतोपरी मदत करत आहे हेच संस्थेच्या वतीने शाहू महाराजांना अभिवादन असेल.

**दिनांक २७ जून २०२०**



## दिनांक ०८ जुलै २०२०

## राजगृहावर हल्ला करणाऱ्या आरोपीवर कारवाई करावी.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पुस्तकासाठी राजगृह तयार केला होता.राजगृह हे तमाम शिक्षणप्रेमींसाठी प्रेरणास्थान आहे.राजगृहावर काही समाजकंटकानी हल्ला केला कुंड्याची तोडफोड केली.CCTV ची तोडफोड केली.बंगल्याच्या काचा तोडण्यात आल्या.आरोपीना तात्काळ शिक्षा व्हावी यासंदर्भात पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त यांना विशेष शाखा निरीक्षक गोकुळे साहेब यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे ,महासचिव संतोष शिंदे,सचिव नीरज भालेराव यांनी निवेदन दिले तसेच मा. मुख्यमंत्री ,मा. उपमुख्यमंत्री ,मा. गृहमंत्री याना मेलद्वारे निवेदन पाठवण्यात आले....

PHOENIX NEWS

HOME | MAHARASHTRA | PIMPRI CHINCHWAD

# CBSE अभ्यासक्रमातील धर्मनिरपेक्षता ,लोकशाही ,नागरिकत्व ,राष्ट्रवाद ,नोटबंदी व इतर प्रकरणे वगळण्यात येऊ नयेत – रयत विद्यार्थी विचार मंच

By admin@phoenixnews.press - July 9, 2020 339 0

RAYAT VIDYARTHI VICHAR MANCH रयत विद्यार्थी विचार मंच
एकच ध्यास विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास
(महाराष्ट्र राज्य)

पिंपरी चिंचवड, दि.९ जुलै (फिनिक्स न्यूज) : कोरोना आपत्तीच्या पार्श्वभूमीवर अभ्यासक्रमातुन CBSE ने आज २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठीचा अभ्यासक्रम निश्चित केला असून मूळ अभ्यासक्रमातुन ३० टक्के महत्वपूर्ण अभ्यासक्रम वगळण्यात आला आहे, सुधारित पाठयक्रमानुसार इयत्ता १० वी च्या अभ्यासक्रमातून लोकशाही आणि वैविध्यता,लिंगिक, धार्मिक, आंदोलन आणि लोकशाही पुढील आव्हान हे महत्वपूर्ण प्रकरणे वगळण्यात आली आहेत.तर इयत्ता ११ वी साठी संघराज्यवाद नागरिकत्व,राष्ट्रवाद,धर्मनिरपेक्षता आणि भारतातील स्थानिक सरकारची वाढ यावरील प्रकरणे वगळण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे इयत्ता १२ विच्या विद्यार्थ्यांना पाकिस्तान, म्यानमार, बांग्लादेश, श्रीलंका,आणि नेपाळ या शेजारी देशाबरोबरचे भारताचे संबंध भारताच्या बदलत्या आर्थिक विकासाचे स्वरूप देशातील सामाजिक चळवळी आणि नोटबंदी सारख्या अन्य विषयांशी संबंधित प्रकरणाचा अभ्यास करण्याची आवश्यकता नाही. विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचा ताण कमी करण्यासाठी असा निर्णय केंद्रीय शिक्षण मंडळाने घेतल्याचे स्पष्ट केले आहे.

CBSE अभ्यासक्रमातील धर्मनिरपेक्षता ,लोकशाही...
phoenixnews.press

केंद्रीय शिक्षण मंडळाचा हा निर्णय अतीशय चुकीचा असून अतिशय महत्वपूर्ण अभ्यासक्रम शिक्षण मंडळाने वगळला आहे. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सामाजिक चळवळी,संघराज्यवाद हे अतिशय महत्वाचे घटक असून हे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडणारी, तसेच भारतीय संविधानाच्या मूळ गाभ्यातील हि प्रकरणे आहेत. जर संविधानचा मूळ गाभा आपण विद्यार्थ्यांना शिकवणार नसू तर आपण एकप्रकारे अतिशय नित्कृष्ट दर्जाचे शिक्षण देऊन आपण काय साध्य करणार आहोत हा प्रश्न पडतो.

इतिहासात अनेक सामाजिक चळवळी झाल्या त्या आजही आपल्याला प्रेरणा देतात. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर हा देश एक धर्मनिरपेक्ष देश म्हणून निर्माण झाला. हा देश आदर्श तत्वावर चालण्यासाठी संघराज्यवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता ,स्वातंत्र्य समता बंधुता हि तत्वे दिली.. आपण जर आपल्या देशासंबंधित शिक्षण देशाची शासनप्रणाली विद्यार्थ्यांना शिकवणार नाही तर उद्याचे देशाचे उज्वल भविष्य असणारे विद्यार्थी हा देश कसा चालवणार ?

CBSE अभ्यासक्रमामधून धर्मनिरपेक्षता, लोकशाही, नागरिकत्व, राष्ट्रवाद, नोटबंदी व इतर प्रकरणे वगळण्यात येऊ नये अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंच चे संस्थापक-अध्यक्ष धम्मराज नवनाथ साळवे व महासचिव संतोष शिंदे यांनी संस्थेच्या वतीने मा. प्रधानमंत्री, भारत सरकार, मा. मनोज अहुजा मुख्य अधिकारी (CBSE), मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र सरकार, मा. वर्षा गायकवाड शिक्षण मंत्री,महाराष्ट्र सरकार यांना निवेदन देऊन केली आहे.

दिनांक ०९ जुलै २०२०



दिनांक ०१ ऑगस्ट २०२०
रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने लोकशाहीर,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती संस्थेच्या संपर्क कार्यालयात साजरी करण्यात आली.



अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती साजरी

पिंपरी : रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दीनिमीत्त त्यांच्या प्रतिमेस अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी महासचिव संतोष शिंदे, राज्य सचिव नीरज भालेराव, राज्य संघटक रोहित कांबळे, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, शहराध्यक्ष महेश गायकवाड आदी उपस्थित होते.






## दिनांक १७ ऑगस्ट २०२०

## गुणवंत विद्यार्थी बक्षीस वितरण कार्यक्रम रद्द करू नये.

पिंपरी चिंचवड शहरातील SSC आणि HSC गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि बक्षीस वितरण रद्द न करता योग्य ती काळजी घेऊन कार्यक्रम करण्यात यावा व लवकरात लवकर बक्षिसाची रक्कम विद्यार्थ्यांना मिळावी   यासंदर्भात रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने मा. महापौर उषा माई ढोरे यांना निवेदन देताना संस्थापक अध्यक्ष- धम्मराज साळवे ,महासचिव संतोष शिंदे यावेळी महापौर यांनी सकारात्मक दर्शवली.



## गुणवंतांच्या सत्काराची मागणी

**पिंपरी :** शहरातील दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करावा, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचतर्फे आयुक्त श्रावण हर्डीकर व महापौर उषा ढोरे यांच्याकडे करण्यात आली आहे. याबाबत मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी महापौरांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, दहावी व बारावी परीक्षेचा निकाल लागून बराच कालावधी उलटून गेला आहे. मात्र, गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यासंदर्भात महापालिकेकडून कोणत्याही प्रकारचे नियोजन झालेले नाही. विद्यार्थ्यांच्या पुढील भवितव्याचा विचार करून सत्कार होणे गरजेचे आहे.पालिकने कोरोनाचे अथवा इतर कोणतेही कारण पुढे न करता गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराचा कार्यक्रम रद्द करू नये. तत्काळ निधीची तरतूद करून महापालिकेतील सभागृहामध्ये सर्व नियमांचे पालन करून कार्यक्रम घ्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी पुणे ४११ ०१८

माध्यमिक शिक्षण विभाग

दुरध्वनी क्रमांक: 67331347-020 फॅक्स क्रमांक:27425600E-mail :secondary@pcmcindia.gov.in
67331344-020 Website :www.pcmcindia.gov.in

माध्य/शि/३/काबि/ १४६/२०२०
दिनांक:- २७/०८/२०२०

प्रति,
मा. संस्थापक/अध्यक्ष
रयत विद्यार्थी विचार मंच
(महाराष्ट्र राज्य)
पुणे.

विषय:-पिंपरी चिंचवड शहरातील इ.१० वी व १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणेबाबत...
संदर्भ:-आपलेकडील दिंनाक १७/०८/२०२० रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागामार्फत मनपा शाळेत शिक्षण घेणा-या ८०% पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या इ. १० वी तील गुणवंत विदयार्थ्यांना व दिव्यांग विदयार्थ्यांना प्रोत्साहनपर रक्कम (बक्षीस) महापालिकेने ठरवलेल्या धोरणानुसार अदा केले जाते.

सदरची योजना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे राबविणेत येत असुन विदयार्थ्यांना प्रोत्साहनपर रक्कम (बक्षीस) थेट पध्दतीने फक्त ECS द्वारे विद्यार्थीच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत. तसेच मा. आयुक्त यांचेकडील परिपत्रकान्वये दिलेल्या आदेशानुसार सण सोहळयांवर होणा-या खर्चावर नियंत्रण ठेवणेबाबत कळविणेत आले आहे. तसेच सध्या कोरोना या साथीच्या रोगाचा संसर्ग वाढत असल्याने देखील विद्यार्थी सत्कार समारंभ न करता फक्त ECS द्वारे रक्कम अदा करणेस मान्यता मिळालेली आहे.

माहीतीसाठी सविनय सादर.

आपला विश्वासु,
शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

पुढारी

## दहावीतील गुणवंतांना १ कोटी ५ लाख

### महापालिका विद्यार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा करणार

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

पिंपरी-चिंचवड महापालिका शाळेतील दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना १ लाख ते २५ हजार रुपयांचे बक्षीस दरवर्षी दिले जाते. यंदाच्या वर्षी एकूण २६२ विद्यार्थी या बक्षिसासाठी पात्र ठरले असून, त्यासाठी एकूण १ कोटी ५ लाख २५ हजार रुपयांच्या रकमेचे वितरण त्यांच्या बँक खात्यावर थेट 'ईसीएस'द्वारे केले जाणार आहे.

दहावीच्या परीक्षेत ८० टक्केपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पालिकेतर्फे प्रोत्साहनपर बक्षीस रक्कम दिली जाते. दहावीचा निकाल २९ जुलैला इंटरनेटवर प्रसिद्ध झाला. त्यात ९० टक्केपेक्षा अधिक गुण मिळविणारे २० विद्यार्थी आहेत. त्यांना प्रत्येकी १ लाखाप्रमाणे एकूण २० लाख रुपये दिले जाणार आहेत. ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे ९० विद्यार्थी असून, त्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांप्रमाणे एकूण ४५ लाख रुपये वितरित केले जाणार आहेत. ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविलेले तब्बल १४३ विद्यार्थी आहेत. त्यांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे बक्षीस आहे. ती एकूण ३५ लाख ७५ हजारांची रक्कम आहे. दिव्यांग गुणवंत विद्यार्थी ९ असून, त्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. ती एकूण रक्कम ४ लाख ५० हजार आहे.

एकूण १ कोटी ५ लाख २५ हजार रुपये बक्षीस म्हणून दिले जाणार आहेत. ही रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट 'ईसीएस'द्वारे जमा केली जाणार आहे. मात्र, दोन विद्यार्थ्यांचे बँक खाते नसल्याने त्यांना धनादेश दिला जाणार आहे.

बक्षीस रकमेसाठी अर्थसंकल्पात केवळ ७० लाखांची तरतूद आहे. 'विविध उपक्रम' लेखाशीर्षावर असलेली ४० लाखांची रक्कम 'गुणवंत विद्यार्थी सत्कार' या लेखाशीर्षावर वर्ग करून ही रक्कम अदा केली जाणार आहे.

My Pimpri Edition
Sep 21, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in



## दिनांक २७ ऑगस्ट २०२०

## गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिस मिळणार

पिंपरी चिंचवड शहरातील SSC आणि HSC गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि बक्षीस वितरण रद्द न करता योग्य ती काळजी घेऊन कार्यक्रम करण्यात यावा व लवकरात लवकर बक्षिसाची रक्कम विद्यार्थ्यांना मिळावी यासंदर्भात रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने मा. महापौर उषा माई ढोरे यांना निवेदन देण्यात आले होते.या मागणीचा सकारात्मक विचार करून महापौर यांनी हि मागणी मान्य केली

## कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

**पिंपरी, दि. २२ (प्रतिनिधी)** - रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती संस्थेच्या पिंपरी येथील कार्यालयात साजरी करण्यात आली.

जयंतीनिमित्त कर्मवीरांच्या प्रतिमेला धम्मराज साळवे व अंजना गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मंचचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेल्या योगदानाचे यावेळी स्मरण करण्यात आले.

प्रभात Wed, 2:
https:/

## कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने अभिवादन



पुणे : आज पद्मश्री.डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती.कर्मवीर भाऊराव पाटील हे समाजसुधारक आणि शिक्षणप्रसारक होते. भाऊरावांनी मागास व गरीब मुलांना शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून त्यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन केली.ते ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे एक महत्वाचे सदस्य होते.त्यांचा भारतीय स्वातंत्र्यलढ्यात हि सहभाग होता. भाऊरावांनी कमवा व शिका हि संकल्पना राबऊन गरीब विद्यार्थाना रोजगार व शिक्षण उपलब्ध करून दिले. केले.भाऊराव पाटील यांना अस्पृश्यतेबद्दल प्रचंड चीड होती. भाऊराव पाटील यांच्यावर शाहू महाराजांच्या विचारांचा व कार्यांचा प्रभाव होता. महाराष्ट्राच्या जनतेने भाऊराव पाटलांचा कर्मवीर हि पदवी देऊन गौरव केला. तसेच भारतीय केंद्रशासनाने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन गौरविले. पुणे विद्यापीठाने त्यांना इसवी सन १९५१ मध्ये डी. लिट. हि पदवी दिली. रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने संस्थेच्या पिंपरी कार्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेला संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे व कार्याध्यक्ष अंजना गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी संस्थापक धम्मराज साळवे यांनी असे मत व्यक्त केले कि, भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेमुळे व त्यांच्या कमवा व शिका या संकल्पनेमुळे ज्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत नव्हते ज्यांची परिस्थिती हलाखीची होती.

पुढारी



**रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली.**

## कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने संस्थेच्या पिंपरी कार्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेला मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे व कार्याध्यक्ष अंजना गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संस्थापक धम्मराज साळवे म्हणाले, की भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेमुळे व त्यांच्या 'कमवा व शिका' या संकल्पनेमुळे ज्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत नव्हते ज्यांची परिस्थिती हलाखीची होती अशी मुले आज मोठ्या पदावर काम करत आहेत. भाऊरावांच्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष झालेला आहे व आशिया खंडात आज सर्वांत मोठी रयत शिक्षण संस्था नामांकित आहे. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थादेखील कर्मवीरांच्या पावलावर पाऊल ठेवून गरीब, गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक न्याय हक्कासाठी काम करेल. याप्रसंगी महासचिव संतोष शिंदे, सचिव नीरज भालेराव आदी उपस्थित होते.

My Pimpri Edition
Sep 23, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

**दिनांक २२ सप्टेंबर २०२०**

कर्मवीर भाऊराव पाटील यांना
रयत विदयार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने
स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन




पिंपरी येथील होतकरू विद्यार्थीनी इयत्ता ११ वि एस.एस.अजमेरा महाविद्यालयात शिक्षण घेत होती.परंतु तिला दुसऱ्या कॉलेज ला ऍडमिशन घ्यावयचे असल्या कारणाने तिला कॉलेजचा दाखला हवा होता.परंतु एस.एस.अजेमरा कॉलेजची ६५३० रुपये फिस बाकी असल्याने तिला ते कॉलेज दाखला देण्यास नकार देत होते.यासाठी या विद्यार्थिनीच्या पालकांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेकडे सहकार्य मिळावे यासाठी विनंती अर्ज केला होता.  रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर व महासचिव संतोष शिंदे यांनी आज एस एस अजमेरा कॉलेज ला भेट देऊन त्या विद्यार्थिनींची फी माफ करून घेतली व तिला तिचा दाखला मिळवून दिला त्याबाबद्दल विद्यार्थिनीच्या पालकांनी संस्थेचे आभार मानले.

सकाळ

## रयत विद्यार्थी मंचातर्फे हाथरस घटनेचा निषेध



पिंपरी : हाथरस घटनेतील पीडितेला श्रद्धांजली वाहताना रयत विद्यार्थी विचार मंचाचे सदस्य.

**पिंपरी, ता. ६ :** रयत विद्यार्थी विचार मंचातर्फे हाथरस घटनेतील पीडितेला श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच, उत्तर प्रदेश सरकार व आरोपींच्या अमानुष कृत्याचा पिंपरीतील संपर्क कार्यालयात निषेध करण्यात आला.

पिंपरी-चिंचवड शहर समनव्यक अर्चना परब म्हणाल्या, ''भाजप सरकारच्या राज्यात गाई सुरक्षित आहेत, पण ताई सुरक्षित नाहीत. सरकारला महिलांचे रक्षण करता येत नसल्यास आम्हाला आत्मरक्षणासाठी शस्त्र परवाने द्यावे.'' शहर समन्वयक प्रतिभा बनसोडे म्हणाल्या, ''सरकारला 'बेटी पढाव बेटी बचाव' अशा योजना चालवण्याचा अधिकार नाही.'' शहर सहसचिव भाग्यश्री आखाडे म्हणाल्या, ''आमचा कोणत्याही सरकारला विरोध नसून अत्याचारी मानसिकतेला विरोध आहे. त्यासाठी सरकारने कायद्यांची कठोर अंमलबाजवणी करून आरोपीना तत्काळ फाशी देण्याची तरतूद केली पाहिजे.'' संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, उपाध्यक्ष संदेश पिसाळ, संघटक रोहित कांबळे, सचिव नीरज भालेराव, प्रणव गायकवाड, सुशांत कांबळे उपस्थित होते.

Pune, PCMC-Today
07/10/2020 Page No. 5

## हाथरसच्या पीडितेस रयत विद्यार्थी विचार मंचची आदरांजली

**पिंपरी, दि. ७ (प्रतिनिधी) -** उत्तर प्रदेशच्या हाथरसमधील लैंगिक अत्याचाराच्या घटनेने संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेचा निषेध करीत, रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने या घटनेतील पीडितेला आदरांजली वाहण्यात आली. संस्थेच्या पिंपरी कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला.

या वेळी पिंपरी-चिंचवड शहर समन्वयक अर्चना परब यांनी असे मत व्यक्त केले की, भाजप सरकारच्या राज्यात गाई सुरक्षित आहेत; पण ताई सुरक्षित नाही, त्यामुळे सरकारला जर महिलांचे रक्षण करता येत नसेल तर त्यांनी आम्हाला आत्मरक्षणासाठी शस्त्र परवाने द्यावे. बलात्कारी मानसिकतेला विरोध आहे.

या वेळी संस्थापक-अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, उपाध्यक्ष संदेश पिसाळ, संघटक रोहित कांबळे, सचिव नीरज भालेराव, सहसचिव भाग्यश्री आखाडे, समन्वयक अर्चना परब, समन्वयक प्रतीभा बनसोडे, प्रणव गायकवाड, सुशांत कांबळे उपस्थित होते.

प्रभात Thu, 08 October 2020 https://epaper.eprabhat.

### दिनांक ०६ ऑक्टोबर २०२०

हाथरस येथील बलात्कार पिडीतेस रयतच्या वतीने श्रद्धांजली व या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.



## दिनांक १९ ऑक्टोबर २०२०

## विद्यार्थी भवन निर्माण करावे

पिंपरी चिंचवड शहरात अनेक विद्यार्थी संपूर्ण राज्यातून शिक्षणासाठी,स्पर्धा परीक्षा देण्यासाठी,व विविध कारणा साठी काही दिवस शहरात येत असतात. अनेक विद्यार्थी हे गरीब कुटुंबातील असतात.ज्यांना शहरात आल्यावर राहण्याची खूप मोठी गैरसोय होते.आणि खाजगी ठिकाणी राहणे त्यांना परवडत नाही.त्यांना राहण्याची सोय होईल व स्पर्धा परीक्षा केंद्र व इतर शैक्षणिक सुविधा तिथे मिळतील.असे विद्यार्थी भवन महापालिकेने पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकामागची जी मोकळी पडीक जागा आहे त्या ठिकाणी व ते बाबासाहेबांच्या कार्याला साजेल असेल.असे विद्यार्थी भवन निर्माण करावे.अश्या आशयाचे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी विधानसभेचे आमदार अण्णा बनसोडे यांना देण्यात आले.



### भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी भवन उभारणे बाबत : आ. अण्णा बनसोडे यांना निवेदन

पिंपरी : पिंपरी चिंचवड हि आशिया खंडातील श्रीमंत महानगरपालिका म्हणून प्रसिद्ध आहे. पिंपरी चिंचवड शहराला कामगारनगरी म्हणून ओळखले जाते.परंतु जसा जसा शहराचा कायापालट होत गेला आणि शहरामध्ये अनेक शैक्षणिक संस्था निर्माण झाल्या.आणि पुण्याबरोबरच पिंपरी चिंचवड शहराला हि शैक्षणिक नगरी म्हणून ओळख प्राप्त होऊ लागली.आज महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशाच्या कानाकोपर्यातून विद्यार्थी पिंपरी चिंचवड शहरात शिक्षणासाठी येतात. आज शिक्षणाचं बाजारीकरण झालेलं आहे.शोषीत,पीडित,वंचीत विद्यार्थ्यांना शिक्षण शिक्षण घेणे अवघड झालं आहे. ज्या विदयार्थ्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे ते विद्यार्थी उच्चभ्रू वसतिगृहामध्ये राहतात.परंतु अनेक विद्यार्थ्यांची परिस्थिती अतिशय हल-ाखीची असते.त्या विद्यार्थ्यांना खाजगी वसतिगृहामध्ये राहणे परवडत नाही.अनेक विदयार्थी नोकरीच्या शोधात,स्पर्धा परीक्षा देण्यासाठी काही दिवस तसेच शिक्षण घेण्यासाठी शहरात येत असतात. तेंव्हा या विद्यार्थ्यांची गैरसोय होते. विद्यार्थ्यांना ना इल-ाजाने भरमसाठ पैसे देऊन हॉटेल किंवा इतरत्र राहावे लागते. पिंपरी चिंचवड महान-गरपालिकेकडून अश्या विद्यार्थ्यांसाठी सध्या तरी कोणतीही सुविधा नाही.

म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक याच्या पाठीमागे जी जागा रिकामी आहे. त्या जागेवर डॉ. बाबासाहेब यांच्या नावे विदयार्थी भवन उभा करावे. कारण बाबासाहेब आंबेडकर हे एक जगातील एक आदर्श विदयार्थी म्हणून गणले जातात. आणि राज्यशासनाने ७ नोव्हेंबर बाबासाहेबांचा शाळा प्रवेश दिन हा विद्यार्थी दिन साजरा करण्याचे घोषित केले आहे.

म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने हि बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करत ७ नोव्हेंबर २०२० या दिवशी या शुभ कार्याचे भूमिपूजन करावे. जेणेकरून सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांना या विद्यार्थी भवनाचा उपयोग होईल व राहण्यास मदत होईल.बाबासाहेबाना त्यांच्या विद्यार्थी दशेत ज्या ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या त्या तरी आताच्या विद्यार्थ्यांना सहन कराव्या लागू नये याची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने काळजी घावी.त्यासाठी पालिकेने लवकरात लवकर विद्यार्थी भवन निर्माण करण्यासाठी प्रयत्नं करावे.

अश्या आशयाचे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी विधानसभेचे विद्यमान आमदार मा.अण्णा बनसोडे यांना देण्यात आले.यावेळी आमदार अण्णा बनसोडे यांनी असे आश्वासन दिले की शक्य झाल्यास आंबेडकर स्मारकाच्या मागे जी जागा आहे अथवा शहरात इतरत्र ज्या ठिकाणी योग्य जागा उपल्बध होईल व बाबासाहेबांच्या कार्याला साजेशे होईल अशा ठिकाणी आपण लवकरात लवकर बाबासाहेबांच्या नावे विद्यार्थी भवन निर्माण करू सदर विषयाचे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंच अध्यक्ष धम्मराज साळवे ,महासचिव संतोष शिंदे यांच्या वतीने आणा बनसोडे ,आमदार पिंपरी विधान सभा याना देण्यात आले .



आ. अण्णा बनसोडे यांना मागणीचे निवेदन देताना धम्मराज साळवे

## डॉ. आंबेडकर विद्यार्थी भवनाची मागणी

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकामध्ये असलेल्या रिकाम्या जागेत डॉ. बाबासाहेब यांच्या नावे विद्यार्थी भवन उभे करावे, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचतर्फे करण्यात आली आहे. याबाबत संस्थेचे संस्थापक धम्मराज साळवे यानंतर आमदार अण्णा बनसोडे यांना निवेदन दिले आहे. यामध्ये म्हटले आहे की, पुण्याबरोबरच पिंपरी-चिंचवड शहराला ही शैक्षणिक नगरी म्हणून ओळख प्राप्त होऊ लागली. अनेक विद्यार्थी नोकरीच्या शोधात, स्पर्धा परीक्षा देण्यासाठी शहरात येत असतात. या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी महापालिकेने विद्यार्थी भवन उभे करावे. या वेळी आमदार अण्णा बनसोडे यांनी लवकरात लवकर विद्यार्थी भवन निर्माण करू, असे आश्वासन दिले.

**दिनांक २० ऑक्टोबर २०२०**








## दिनांक २० ऑक्टोबर २०२०

घरातील गरीब परिस्थिती मुळे पिंपरी येथील रस्त्यावर कचऱ्याच्या प्लास्टिक बॅग विक्री करताना दोन मुलांना पाहिले आणि विचारपूस केल्यानंतर शिक्षण घेत असलेले हे विद्यार्थी परिस्थितीमुळे शिक्षण घेत हा धंदा करत घर चालवण्यासाठी मदत करत असल्याचे माहिती मिळाली ,दोघांनी ही ऑफिसवर बोलवून घेऊन चर्चा करून शिक्षणाची आवड पाहून शिक्षणासाठी लागणारी सर्व मदत रयत विद्यार्थी विचार मंच करेल असे दोघांनाही विश्वास दिला,त्यांचे सदस्य फॉर्म भरून घेतले.




**दिनांक २५ ऑक्टोबर २०२०**

**पूरग्रस्त विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे.**

महाराष्ट्राच्या विविध भागात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने पूर परिस्थिती निर्माण झाली आहे.त्यामुळे शेतीचे व्यवसायाचे व नागरिकांच्या साधनसंपत्तीचे प्रचंड नुकसान झाले आहे.अश्या ठिकाणी सरकारने ओला दुष्काळ जाहीर करून राज्यशासनाने सर्व विद्यार्थ्यांचे सरसकट शैक्षणिक शुल्क माफ करावे व सर्व शैक्षणिक सुविधा मोफत द्याव्या.अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने मा.तहसिलदार पिंपरी चिंचवड यांच्यामार्फत मा.मुख्यमंत्री उद्धव ठाकरे साहेब यांना निवेदन पाठवण्यात आले.यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे , महासचिव संतोष शिंदे , सचिव नीरज भालेराव उपस्थित होते..



अपर तहसीलदार गीता गायकवाड यांना मागणीचे निवेदन देताना धम्मराज साळवे आदी.

## पूरग्रस्त विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करा

**पिंपरी :** राज्यातील अतिवृष्टी झालेल्या ठिकाणी ओला दुष्काळ जाहीर करून त्या भागातील सर्व विद्यार्थ्यांचे सरसकट शैक्षणिक शुल्क माफ करावे. तसेच विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सुविधा मोफत द्याव्यात, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी याबाबतचे निवदेन अपर तहसीलदार गीता गायकवाड यांना दिले आहे. यामध्ये म्हटले आहे की, अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात लोकांच्या घरांचे, शेतीचे, व्यवसायाचे नुकसान झाले आहे. अनेक कुटुंब तर पावसाने संपूर्ण पणे उद्ध्वस्त झाली आहेत. शासनाकडून अद्याप सर्व कुटुंबांना हवी तशी मदत देण्यात आली नाही. अशा परिस्थितीत कोणताही विद्यार्थी पैशाअभावी शिक्षण सोडणार नाही याचा विचार केला पाहिजे. पूरग्रस्त भागात ओला दुष्काळ जाहीर करून तेथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करून त्यांना सर्व शैक्षणिक सुविधा मोफत द्यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

दिनांक २६ ऑक्टोबर २०२०




दिनांक २६ ऑक्टोबर २०२०

पिंपरी चिंचवड शहरातील मुजोर व विद्यार्थ्यांवर अन्याय करणाऱ्या खाजगी शाळांवर कारवाई करण्यात यावी यासंदर्भात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांनी मा. शिक्षण अधिकारी पिंपरी  चिंचवड महानगरपालिका यांना भेटून निवेदन दिले.



**रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे भारतरत्न अबुल कलाम आझाद यांची जयंती साजरी करण्यात आली.**

## अबुल कलाम आझाद यांना अभिवादन

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे संस्थेच्या पिंपरी येथील संपर्क कार्यालयात भारतरत्न अबुल कलाम आझाद यांची जयंती साजरी करण्यात आली. रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी महासचिव संतोष शिंदे, सदस्य इसाक पठाण उपस्थित होते. यावेळी धम्मराज साळवे यांनी अबुल कलाम आझाद यांच्या कार्याची माहिती दिली.

My Pimpri Edition
Nov 12, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

### दिनांक ११ नोव्हेंबर २०२०
### भारतरत्न अबुल कलाम आझाद यांची जयंती

रयत विद्यार्थी विचार मंच संस्था संपर्क कार्यालय पिंपरी या ठिकाणी भारताचे पहिले शिक्षणमंत्री भारतरत्न अबुल कलाम आझाद यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी महासचिव संतोष शिंदे व सदस्य इसाक पठाण उपस्थित होते.

## रयत विद्यार्थी विचार मंच संपर्क कार्यालयात भारतरत्न अबुल कलाम आझाद यांची जयंती साजरी



**पुणे –** भारतरत्न अबुल कलाम आझाद एक भारतीय प्रमुख राजकीय पुढारी होते. त्यांचे मूळ नाव मोहिउद्दीन अहमद असे असून अबुलकलाम म्हणजे वाचस्पती ही त्यांची पदवी होती. पुढे 'आझाद' (स्वतंत्र) हे टोपणनावही त्यांना ही उपाधि मिळाली. त्यांचा जन्म मक्केला झाला. वडिलांबरोबर १८९० साली ते कलकत्याला आले. पारंपरिक मुसलमानी शिक्षणपद्धतीप्रमाणे मौ. आझादांनी फार्सी, उर्दू व अरबी या भाषांचे प्रथम अध्ययन करून नंतर तर्कशास्त्र, इस्लाम धर्म, तत्त्वज्ञान व गणित ह्यांचा अभ्यास केला.

पुढे सर सय्यद अहमदखान ह्यांच्या लेखांचा परिणाम होऊन मौलानांनी इंग्रजीचा अभ्यास स्वतंत्रपणे सुरू केला.१९०८ मध्ये ईजिप्त, अरबस्तान, तुर्कस्तान, फ्रान्स इ. देशांना त्यांनी भेटी दिल्या. तेथील क्रांतिकारकांच्या संपर्कामुळे त्यांची राजकीय मते बदलू लागली आणि कलकत्त्यास परत येताच हिंदी मुसलमानांनी स्वातंत्र्यसंग्रामात पुढाकार घ्यावा, हे मत त्यांनी प्रतिपादिले. लोकजागृतीसाठी १९१२ साली कलकत्ता येथे त्यांनी अल्-हिलाल हे उर्दू साप्ताहिक सुरू केले.

अनेक वृत्तपत्रांतून 'आझाद' ह्या टोपणनावाने ते लेखन करीत. अल्-हिलालमधील प्रखर राजकीय टीकेमुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्याकडून १०,००० रुपयांचा जामीन मागितला. आझादांनी तो दिला नाही, म्हणून ते वृत्तपत्र बंद पडले. १९१५ साली त्यांनी अल्-बलाघ हे दुसरे वृत्तपत्र काढले. त्यामुळे आझादांना अनेक प्रांतांत जाण्यास बंदी घालण्यात आली; पुढे त्यांना सांचीला स्थानबद्ध करण्यात आले. मुसलमानांत त्यांच्या अटकेमुळे नवे वारे संचारले. १९२० साली त्यांची सुटका झाली. ते असहकाराच्या चळवळीत सामील झाले. १९२१ मध्ये पुन्हा त्यांना अटक करण्यात आली; पण एका वर्षानंतर त्यांना मुक्त करण्यात आले; १९२३ च्या दिल्ली येथील काँग्रेसच्या विशेष अधिवेशनाचे ते अध्यक्ष झाले. १९३० मध्ये त्यांना पुन्हा कैद झाली. ह्या वेळी मुसलमान जमातीस सत्याग्रहात सामील करून घेण्याचे मुख्य श्रेय आझादांनाच मिळाले. आझाद १९३९ ते ४६ पर्यंत काँग्रेसचे अध्यक्ष होते. १९४२ च्या चले जाव आंदोलनाच्या वेळी त्यांना पुन्हा तुरुंगवास भोगावा लागला. १९४५ साली सर्व नेत्यांबरोबर त्यांची सुटका झाली.

१९४२ ची क्रिप्सयोजना, १९४५ ची वेव्हेलची सिमला परिषद व १९४६ मधील ब्रिटिश मंत्र्यांचे शिष्टमंडळ इ. प्रसंगीच्या सर्व वाटाघाटींत काँग्रेसतर्फे अध्यक्ष ह्या नात्याने त्यांनीच पुढाकार घेतला. स्वातंत्र्यानंतर ते केंद्रीय मंत्रिमंडळात सामील झाले आणि अखेरपर्येत शिक्षणमंत्री म्हणून राहिले.

अश्या या महान नेतृत्वाची रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने संपर्क कार्यालय पिंपरी येथे जयंती साजरी करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी महासचिव संतोष शिंदे सदस्य इसाक पठाण उपस्थित होते.



**दिनांक १४ नोव्हेंबर २०२०**

**पुणे पदवीधर मतदारसंघ निवडणूक**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य पाहून पुणे पदवीधर मतदार संघाच्या अपक्ष उमेदवार मा.निताताई ढमाले यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर व महासचिव संतोष शिंदे यांची भेट घेतली. निवडून आल्यानंतर शैक्षणिक क्षेत्रात आपण काय कार्य करणार याचा त्यांनी जाहीरनामा सांगितला तसेच शैक्षणिक क्षेत्र,पदवीधर विद्यार्थ्यांच्या समस्या अश्या विविध विषयांवर यावेळी चर्चा झाली.

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेने पूणे पदवीधर मतदार संघात त्यांना सहकार्य करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली..









**दिनांक २३ नोव्हेंबर २०२०**

**विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण सेवा सुरू**

रयत विद्यार्थी विचार मंच शिरूर तालुका तसेच शिरूर शहर च्या वतीने अंगणवाडी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण सेवा सुरू करण्यात आली आहे तसेच विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.त्याठिकाणी उपस्थित शिरूर तालुका प्रमुख समीर काझी,शिरूर शहर महासचिव फैजल सय्यद व शिरूर शहर उपाध्यक्ष पल्लवीताई ईसवे उपस्थित होते.





## दिनांक २३ नोव्हेंबर  २०२०

## केशव घोळवे उपमहापौर पदी निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने शुभेच्छा

संविधान दिन साजरा करण्यात यावा उपमहापौर केशव घोळवे यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,महासचिव संतोष शिंदे यांनी निवेदन दिले. यावेळी केशव घोळवे यांना पुष्पगुच्छ देऊन उपमहापौर पदी निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

# संविधान दिन साजरा व्हावा

## रयत विद्यार्थी मंचचे महापौर, उपमहापौरांना निवेदन



पिंपरी दि. २३ :-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने योग्य ती काळजी घेऊन संविधान दिन साजरा करण्यात यावा अशी मागणी रयत विद्यार्थी मंचच्या वतीने करण्यात आली आहे. यासाठी मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे यांनी महापौर सौ. माई ढोरे तसेच उपमहापौर श्री. केशव घोळवे यांना निवेद सादर केले आहे.

रायन विद्यार्थी मंचने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारत देशाला संविधान मिळाले तो दिवस राष्ट्रीय स्तरावर दरवर्षी संविधान दिन म्हणून उत्सहात साजरा केला जातो . परंतु यावर्षी कोरोनाचे सावंत असल्याने यावर्षी सण उत्सव नियमांचे पालन करून साजरे करण्यात आले . संविधान दिन हा अतिशय महत्वाचा दिवस असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सण उत्सव फिजिकल टिस्टन्स च्या नियमांचे पालन करून साजरे केले त्याच प्रमाणे संविधान दिन देखील त्याच प्रमाणे साजरा केला पाहिजे . पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करून व तसेच महानगरपालिका व भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर स्मारक पिंपरी येथे विद्युत रोषणाई करण्यात यावी . तसेच शासकीय इतमामात भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात यावे.

दिनांक २४ नोव्हेंबर २०२०




## दिनांक २६ नोव्हेंबर २०२०

## शहिदांना अभिवादन

२६ नोव्हेंबर मुंबई येथील दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेल्या शहिदांना पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड येथे रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने अभिवादन करून आदरांजली अर्पण करण्यात आली




दिनांक २६ नोव्हेंबर २०२०

रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य संस्थेच्या वतीने संविधान दिनानिमित्त व २६/११ झालेला हल्ला व त्या हल्ल्याला प्रतित्युर म्हणून महाराष्ट्र पोलिसांनी दाखवलेल्या शौर्याचा सन्मान करत पिंपरी चिंचवड पोलीस उपायुक्त मा.सुधीर हिरेमठ यांना भारतीय संविधानाची प्रत भेट दिली.यावेळी साहेबांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.











## दिनांक २६ नोव्हेंबर २०२०
## संविधान दिन साजरा

रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य व पिंपरी चिंचवड शहर कमिटी यांच्या वतीने संस्थेच्या संपर्क कार्यालय येथे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे संविधान दिन साजरा करण्यात आला.यावेळी भारतीय संविधानाचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर यांना व भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.व प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.यावेळी संस्थेचे व अन्य सामाजिक संघटनांचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते..







**दिनांक २६ नोव्हेंबर २०२०**

**शिरूर मध्ये संविधान दिन साजरा**

रयत विद्यार्थी विचार मंच च्या माध्यमातून संविधान दिनाचे औचित्य साधून संविधान प्रास्ताविका रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयास सप्रेम भेट दिली. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले त्यावेळी उपस्थित शिरूर तालुका प्रमुख समीर काझी शिरूर महासचिव फैजल सय्यद, शिरूर शहर उपाध्यक्ष पल्लवी ईसवे, शिरूर तालुका संपर्कप्रमुख आबिद बागवान, शिरूर तालुका खजिनदार प्रशांत सूर्यतळ व विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डोंगरे मॅडम, पर्यवेक्षक चौधरी सर व इतर सहकारी सह शिक्षक यांची उपस्थित होते.

लोकमत



# रयत विद्यार्थी मंचच्या वतीने संविधान दिन साजरा

शिरुर: रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. या वेळी भारतीय संविधानाची प्रास्ताविकीची प्रत रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश विद्यालयास भेट दिली. दरम्यान, संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंचचे शिरूर तालुका समीर काझी ,महासचिव फैजल सय्यद, पल्लवी इसवे आबिद बागवान, प्रशांत सूर्यतळ , विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अस्मिता डोंगरे , पर्यवेक्षक चौधरी आदी उपस्थित होते.

Hello Pune Gramin
Page No. 3 Nov 28, 2020
Powered by: erelego.com

लोकमत Feedback

## दिनांक २६ नोव्हेंबर २०२०
## सातारा जिल्ह्यात संविधान दिन साजरा

रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य सातारा जिल्हा यांच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला.कराड बस डेपो आगारामध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी रुपेश साठे,रोहित सपकाळ,कराड आगार व्यवस्थापक सय्यद मॅडम, वर्कशॉप AWS पाटील मॅडम, कराड आगार TI किशोर जाधव, सुरक्षा रक्षक भरत पुजारी, आणि आगारातील इतर कर्मचारी उपस्थित होते यावेळी संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.व सर्वांना संविधानाच्या प्रास्ताविक भेट दिल्या.तसेच कराड शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमित बाबर व विजय गेरडे तसेच मसुर पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी क्रुष्णा साळुंखे व पोलीस निरीक्षक एस जाधव यांना सातारा जिल्हाध्यक्ष अक्षय चव्हाण यांच्या वतीने संविधानाच्या प्रास्ताविक भेट देण्यात आल्या.

१०१
# तरुण भारत
सातारा
www.tarunbharat.com
पाने १२+१६ ✦ ₹ ६.०० बुधवार दि. २ डिसेंबर २०२० बेळगाव • गोवा • मुंबई

# रयत विद्यार्थी मंचतर्फे संविधान दिन

प्रतिनिधी
कराड

रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने कराड एसटी आगारामध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी मंचचे जिल्हाध्यक्ष अक्षय चव्हाण, वर्कशॉपचे रुपेश साठे, रोहित संकपाळ यांची उपस्थिती होती.

कराड आगार व्यवस्थापक श्रीमती सय्यद, श्रीमती पाटील, किशोर जाधव, सुरक्षारक्षक भरत पुजारी आणि आगारातील इतर कर्मचारी उपस्थित होते. संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

कराड शहर पोलीस स्टेशनमध्ये संविधानाचे प्रस्ताविकाचे वाटप करून संविधान दिन साजरा करण्यात आला. पोलीस अधिकारी अमित बाबर व विजय गेयडे यांच्या उपस्थितीत संविधान दिन साजरा करण्यात आला. मसूर पोलीस स्टेशनमध्येही संविधान दिन साजरा करण्यात आला. संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहीक वाचन करण्यात आले.



**कराड: संविधान दिनी उपस्थित आगार व्यवस्थापक, श्रीमती सय्यद, श्रीमती पाटील, अक्षय चव्हाण, रूपेश साठे, भरत पुजारी व इतर.**

MMP/- EDIT-4/IND

पुण्य नगरी

# सरकारची वर्षपूर्ती पाहता भ्रमनिरास; विद्यार्थ्यांसह पालकांना त्रास



सरकारची वर्षपूर्ती पाहता भ्रमनिरास झाला. तीन पक्षांचे सरकार असल्यामुळे मंत्र्यांमध्ये ताळमेळ नाही. ऑनलाइन शिक्षणाचे फंड काढून सरकारने विषमतेला वाव दिला. गरीब विद्यार्थी शिक्षणापासून अलिप्त राहिले आहेत. एमपीएससी बाबतीतदेखील विद्यार्थ्यांनी मेहनत घेऊन अभ्यास केला. परंतु, ऐनवेळी परीक्षा रद्दचा निर्णय सरकारने घेतल्यामुळे याचा विद्यार्थ्यांना प्रचंड मानसिक त्रास झाला. आरटीई प्रवेशासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना व पालकांना त्रास झाला. **– संतोष शिंदे, युवक, पिंपरी**

**दिनांक २८ नोव्हेंबर २०२०**

महाराष्ट्र राज्य सरकारच्या वर्षपूर्तीवर प्रदेश महासचिव संतोष शिंदे
यांची दैनिक पुण्यनगरी मध्ये आलेली प्रतिक्रिया







## दिनांक २८ नोव्हेंबर २०२०

## महात्मा जोतिबा फुले पुण्यतिथी

मावळ कार्यकारणीच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या पुण्यतीथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य मावळ तालुका प्रमुख अतुल अशोक वाघमारे, मावळ उपाध्यक्ष सागर रोहिदास गायकवाड , मावळ सदस्य युवा व्याख्याते विक्रांत शेळके, मावळ संघटक विकी वाघमारेआदी जन उपस्थित होते...



**०६ डिसेंबर २०२०**

**महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन**

सातारा जिल्ह्याच्या वतीने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले यावेळी सातारा जिल्हाध्यक्ष अक्षय चव्हाण व सागर घोडके उपस्थित होते.











दिनांक ०७ डिसेंबर २०२०

रयत विद्यार्थी विचार मंच (महा.राज्य) मावळ प्रमुख अतुल वाघमारे यांच्या आव्हानाला साथ देऊन तथागत सोशल फाऊंडेशन चे विशाल मोरे सर यांच्या वाढदिवसानिमित्त अढले बु. याठिकाणी कातकरी वस्तीवर खाऊ वाटप व शैक्षणिक साहित्य वाटून वाढदिवस साजरा केला. तेथील लहान मुलांचा आनंद द्विगुणत झाला यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच मावळ प्रमुख- अतुल वाघमारे, सदस्य युवा व्याख्याते- विक्रांत शेळके, उपाध्यक्ष-सागर गायकवाड सदस्य- मयुर वाघमारे सदस्य कुंदन वाघमारे आदी जन उपस्थित होते...













**दिनांक १५ डिसेंबर २०२०**

**वर्धापन दिन**

**दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार**

रयत विद्यार्थी विचार मंच ,महाराष्ट्र राज्य संस्थेचा तिसरा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक पिंपरी चिंचवड महानगरपालिका जनसंपर्क अधिकारी मा. किरण गायकवाड सर उपस्थित होते. यावेळी दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आले..







## दिनांक २१ डिसेंबर २०२०
## गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ

संस्थापक-अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांच्या मार्गदर्शनानुसार रयत विद्यार्थी विचार मंच  महाराष्ट्र राज्य सातारा जिल्हा यांच्या वतीने दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.यावेळी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे पूजन करण्यात आले व सामूहिक वाचन करण्यात आले.दहावी बारावी विद्यार्थ्यांच सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला व  पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. यावेळी सातारा जिल्हाध्यक्ष अक्षय चव्हाण, कराड तालुका अध्यक्ष अभिजीत देसाई, सतारा जिल्हा महासचिव सागर घोडके,सातारा जिल्हा सचिव मोहंम्मदजैद  मोमीन, सातारा जिल्हा संपर्क प्रमुख अक्षय सुतार, हे पदाधिकारी उपस्थित होते.





दिनांक २६ डिसेंबर २०२०

पिंपरी पोलीस वरिष्ठ निरीक्षक मा. मिलिंद वाघमारे साहेब,व API अन्सार भाई शेख या दोन कार्यक्षम पोलीस अधिकाऱ्यांचा भारतीय संविधानाची प्रास्ताविका देऊन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला.





## दिनांक २७ डिसेंबर २०२०

## कोरोनाकाळातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यासाठी पाठपुरावा करावा

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले साहेब यांची संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,महासचिव संतोष शिंदे यांनी भेट घेतली व कोरोनाकाळातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यासाठी पाठपुरावा करावा अशी विनंती केली व संविधान प्रास्ताविक प्रतिमा देऊन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने साहेबांचा सन्मान करण्यात आला.



ME NEWS
mahaenews.com
लढाई सत्याची...लोकशाहीच्या हक्काची !


# विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करून कालवधी वाढवा

## रयत विद्यार्थी विचार मंचचे समाज कल्याण आयुक्तांना निवेदन

**पुणे । दि.२९ । प्रतिनिधी**

पुण्यात अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती विविध कारणासाठी अपात्र ठरविल्या आहेत. त्यांच्या त्रुटी दूर करून त्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करावी, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने करण्यात आली आहे. पुणे समाज कल्याण आयुक्तांना या बाबत निवेदन देण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याची मागणी निवेदनात त्यांनी केली आहे. निवेदनात नमूद केले आहे की, नुकतेच समाजकल्याण विभागातर्फे २६० महाविद्यालयांना शिष्यवृत्ती देण्यासाठी विलंब केल्याप्रकरणी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. अनेक विद्यार्थ्यांचे बँक खाते चुकीचे असणे, आधार कार्डला मोबाईल नंबर अपडेट नसणे, बँक खात्यास आधार कार्ड संलग्नित नसणे, बँक खाते निष्क्रिय असणे, उत्पन्न दाखला जातीचा दाखला अशा त्रुटीमुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यास अडचण निर्माण होत आहे. त्रुटींची पूर्तता करण्यासाठी समाजकल्याण विभागाच्या वतीने कारणे दाखवा नोटीस देऊन महाविद्यालयांना मुदतवाढ दिली आहे. परंतु हि मुदतवाढ पुरेशी नाही. विद्यार्थ्यांना जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले काढण्यासाठी तहसील कार्यालयामध्ये विलंब केला जातो. तासनतास रांगेत उभा राहावे लागते. कागदपत्राअभावी विद्यार्थ्यांना दाखले मिळत नाहीत. एजंट काढून त्यांची आर्थिक लूट होते. यामध्ये विद्यार्थ्यांची खूप धावपळ होते. त्या प्रमाणात विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती हि खूप अल्प प्रमाणात मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करून व शिष्यवृत्तीसाठी असणारी उत्पन्न दाखल्याची अट शिथिल करून विद्यार्थ्यांना शाळेच्या दाखल्यावरती शिष्यवृत्तीचा लाभ द्यावा. तसेच शिष्यवृत्तीच्या कालावधीला मुदतवाढ मिळावी. संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळवून देण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांच्या त्रुटी सोडवाव्या व उत्पन्न दाखले १ ते २ दिवसात विद्यार्थ्यांना कसे उपलब्ध होतील, यासंदर्भात सूचना द्याव्यात, अश्या आशयाचे निवदेन समाज कल्याण आयुक्त पुणे महाराष्ट्र राज्य यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्या वतीने देण्यात आले.

दिनांक २९ डिसेंबर २०२०




दिनांक २९ डिसेंबर २०२०


Thank you